# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

**शंकरशेठ रोड, स्वारगेट पुणे ४११ ०३७**

---

## * प्रेस नोट *

**✱ !! मा.तुकाराम मुंढे अध्यक्ष व व्यवस्थापकिय संचालक यांचेकडून बी.आर.टी मार्गाची तपासणी तपासणीमध्ये नियमबाहय कामकाज, गैरवर्तन आढळून येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई !! ✱**

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे कात्रज - हडपसर, येरवडा-वाघोली, संगमवाडी- विश्रांतवाडी या बी.आर.टी मार्गाची मा.तुकाराम मुंढे (भा.प्र.से) अध्यक्ष व्यवस्थापकिय संचालक यांनी आज प्रत्यक्ष बी.आर.टी. मार्गावर प्रवास करून पाहणी केली. या पहाणी दरम्यान त्यांनी बसमधील बसमधील प्रवाशांशी बससेवेबदद्ल संवाद साधला. या पहाणीचे वेळी केलेल्या तपासणीमध्ये नियमबाहय कामकाज, गैरवर्तन आढळून येणाऱ्या चार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची एका कर्मचाऱ्यावर नोडयुटी कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले, तसेच दोन कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई, एका सेवकावर एक दिवस शासन ससपेंड., सहा कर्मचाऱ्यांवर एक दिवसाचे बिनपगारी बाबतची कारवाई व दोन कर्मचाऱ्यांवार दंडात्मक कारवाई करणेबाबतचे आदेश देण्यात आले. तसेच बसेसमधील भौतिक उणीवांबाबत संबंधीतांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. या पहाणी दरम्यान बी.आर.टी.बसेसमधील आय.टी.एम.एस. प्रणालीमधील ड्रायव्हर डिस्प्ले युनिट (ओ.बी.व्ही) ऑनबोर्ड युनिट उदघोषणा कार्यप्रणाली ॲडीओ प्रणाली यांची प्रत्यक्ष तपासणी करताना सदरची प्रणाली चालक सेवकांना कार्यरत करता येत आहे. अगर कसे याबाबत तपासणी करण्यात आली. या प्रसंगी महमंडळाचे अधिकारी तसेच बसेसमध्ये जीपीआरएस, आयटीएमएस, सेवा पुरविणाऱ्या संबंधीत संस्थांचे प्रतिनीधी उपस्थित होते. प्रत्यक्ष तपासणी व सदर कार्यान्वीत प्रणालीचे अनुषंगाने दिसुन आलेल्या आक्षेप उणीवा यांचे अनुषंगाने प्रणालीमध्ये दुरूस्ती करणेबाबतचे सुचना निर्देश त्यांना देण्यात आले.

कात्रज - हडपसर बी.आर.टी मार्गाची तपासणी सुरू करणेपूर्वी श्री. मुंढे यांनी महामंडळाचे कात्रज स्थानकाची व तेथील कामकाजाची तपासणी केली. या तपासणी दरम्यान कात्रज स्थानकावरून पुणे - मुंबई महामार्गाकडे वळणाऱ्या रस्त्याच्या कॉर्नरवर अनधिकृत पार्किंग केलेल्या वाहनांना जॅमर लावण्याची कार्यवाही करणेबाबत. तसेच महामंडळाचे स्थानकावरून अनधिकृतपणे प्रवाशी वाहतुक करणाऱ्या सहा सिटर रिक्षांवरही कार्यवाही करणेबाबत. संबधीत यंत्रणेला कळवणे बाबत त्वरेने पत्रव्यवहार करण्याचे आदेश महामंडळाचे अधिकाऱ्यांना दिले.

तसेच स्थानकावरील स्टार्टर कामकाज तपासणी करताना नेमूण दिलेल्या वेळी बस मार्गस्थ न करता ती उशीरा मार्गस्थ केल्याचे आढळुन आल्यानंतर स्टार्टर काम पाहणारे श्री. म.ड.शिकीलकर ड्रायव्हर क्र. ८५६ यांना निलंबीत करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच स्थानकावरील बस शेडमधील अनधिकृत जाहिराती, अस्वच्छता, स्टार्टर रूम मधील टॉयलेट अस्वच्छता, परिसरातील अस्वच्छाता, बसशेडच्या मागे ई.मशिन तिकीटांचा रोल असल्याचे आढळुन आल्याने श्री. जगताप कंडक्टर कम स्टार्टर यांचेवर रू. ५०००/- दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले. तसेच श्री. चव्हाण चालक क्र. २४२६ यांनी आज तपासणीचे वेळी नियमीत डयुटी मिळत नसल्याचे सांगितल्या नंतर कायम डयुडी मिळणे संदर्भात अर्ज मागवण्यात आले असताना अर्ज केला नाही. सबब त्यांनी दिशाभुल करून अर्ज न करण्याचे त्यांचे निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले. आर/२४१ बस दरवाज्या दोरीने बांधलेल्या स्थितीत व बस अस्वच्छ असल्याचे दिसुन आल्याने याबाबत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच श्री गोपाळ शिंदे प्रभारी मुकादाम हे तंबाखु खाल्लयाचे निदर्शनास आल्याने त्यांना एक दिवस शासन ससपेंड करण्याचे आदेश देण्यात आले. या तपासणी दरम्यान बस क्र. आर/३२५, आर/२४३ वरील चालक सेवकांकडून आय.टी.एन.एस.प्रणाली अंतर्गत ड्रायव्हर डिस्प्ले युनिट,ऑन बोर्ड युनिट प्रत्यक्ष कार्यरत करून घेण्यात आले. स्थानकावरील बस तपासणीचे वेळी सी.एन.जी/२१७ पुढील दरवाज्याचे ठिकाणचे ब्रॅकेट सुस्थितीत नसल्याचे, आर/३५० बसचा मागील दरवाज्या दोरीने बांधलेल्या स्थितीत असल्याचे, आर/२९२ पुढील व मागील दरवाज्या दोरीने बांधलेल्या स्थितीत. आर/५१६ बसचे ड्रायव्हर केबीनचे उजवे बाजुकडील खिडकी दोरीने बांधलेल्या स्थितीत, आर/२४३ रेडियटर मागील बाजुचा पत्रा तुटलेल्या स्थितीत आढळुन आल्याने या बाबत कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. स्थानकामध्ये असलेल्या कात्रज जकात नाका, पोलिस चौकीचे आवारामध्ये असलेल्या दुचाकी व अन्य वाहनांमुळे बस संचलनास येणारा अडथळा व निर्माण झालेली अस्वच्छता या बाबत कार्यवाही करणेबाबत. संबंधीत चौकीचे अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले. तसेच या स्थानकावरील अस्वच्छता,खडडे, तुटलेल्या फरश्यांचे अवस्थेतील परिसरामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय याबाबत त्वरेने उपाय योजना करण्याबाबत संबंधीत शासकिय यंत्रणेला पत्रव्यवहार

करण्याचे तसेच स्थानकावरील कचऱ्याचे ओला व सुका कचरा वर्गीकरण करण्याची कार्यवाही त्वरेने सुरू करण्याबाबतत लेखी आदेश निगर्मित करण्याचे महामंडळाचे अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले.

कात्रज - हडपसर बी.आर.टी मार्ग तपासणी दरम्यान मार्ग क्र.१२/१० बस क्र. आर/२४३ वरील बस वाहक क्र. ४५२२ श्री. जाधव यांनी प्रवाशी बसमध्ये चढण्यापुर्वीच बस हलवीण्याचे डब्बल बेल निर्देश दिल्याचे आढळुन आल्याने त्यांच्यावर निलंबीतची कारवाई करण्याबाबत आदेशीत करण्यात आले. तसेच आर/१४० मार्ग क्र.१११/५ बस ब्रेकडाउन असल्याचे दिसुन आल्यानंतर या बाबत अधिकमाहिती घेताना बस वाहक श्री. राजमाने क्र.२०१९ यांनी ब्रेकडाउन १ तास १५ मिनिटापुर्वी झाला असताना तो अर्ध्यातासापूर्वी झाल्याची दिशाभूल करणारी, खोटी माहिती दिल्याने व ब्रेक डाउन उशिरा दिल्याने त्यांचेवर निलंबणाची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. फातिमानगर येथे हडपसर बी.आर.टी मार्गात अन्य वाहने तेथील वॉर्डन सेवक श्री.कांबळे, श्री.निकम सोडत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांचेवार एक दिवस बिनपगाराची कारवाई  करण्याचे आदेश देण्यात आले. अशा प्रकारचे निष्काळजीपणे काम करताना आढळल्याप्रकरणी काळुबाई मंदिर या ठिकाणी श्री. ढमढेरे, वॉर्डन यांचेवर अशा प्रकारची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

येरवडा -वाघोली बी.आर.टी.मार्गाचे तपासणीमध्ये खराडी बायपास बी.आर.टी.बसस्टॉप येथे परिसरामध्ये अस्वच्छता व निटनेटकेपणाचा अभाव असल्याचे कारणास्तव श्री. संतोष शुक्ला या सुरक्षा रक्षाकावर एक दिवस बिनपगारीचे कारवाईचे आदेश देण्यात आले. तसेच तपासणी दरम्यान उध्दटवर्तन उल्लट उत्तरे देण्याचे गैरवर्तन करणाऱ्या मार्ग क्र. १५९/४ बस क्र. ५८८ वरील बदली वाहक क्र. ४७४६ श्री. गोकुळ हराळ यांचेवर नोडयुटी कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच मार्ग क्र. १५९/क २, बस क्र. ५९२ वरील श्री. रामदास ढाकणे वाहक क्र. २९२६, यांनी डयुटी कालावधीमध्ये मोबाईलचे वापर केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्यावर एक दिवस बिनपगारीची कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच डयुटी कालावधीमध्ये मोबाईलचा वापर केल्याबद्ल बस क्र. आर/५९१ मार्ग  क्र. १५९/पी २, वरिल श्री. दादासाहेब बेळगे यांचेवर दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले तसेच तपासणीमध्ये गर्दीमुळे दुसऱ्या रिकाम्या बससाठी उतरत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे खाजगी ठेकेदाराकडील श्री.शेषराव बुधवंत चालक ए.एन.क्र. १४१ यांचेवर एक दिव बिनपगारी कारवाईचे आदेश देण्यात आलेले आहेत. तसेच शास्त्रीनगर चौक या ठिकाणी श्री. ब्रिजकुमार, वॉर्डन यांना योग्य ठिकाणी उभे राहुन कामगिरी बजावीण्याचे आदेश देण्यात आले. गुंजन टॉकिज येथिल वॉर्डन यांना त्या ठिकाणी त्यांनी तयार केलेली शेड काढुन टाकण्याचे आदेश देण्यात आले. तपासणी दरम्यान मा. मुंढे यांनी प्रवाशांशी बी.आर.टी. बसे सेवेबाबत संवाद साधला.

---

मा. संपादक **दिनांक : १९/०५/२०१७**

दैनिक.........

यांजकडेस........

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द होण्याची विनंती आहे.

मा. स. कळावे.

**sd**

**कामगार व जनता संपर्क अधिकारी,**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**